**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | |
|---|---|---|---|---|
| Mazaa Cinema | National | May 2015 | 32 | |
| | | | | |

# ‘अल्ट्रा मीडिया’ भारतात प्रमोट करणार मराठी थ्रीडी सिनेमे

मागील काही वर्षांत मराठी चित्रपटसृष्टीत काही थ्रीडी सिनेमे बनू लागले आहेत. परंतु, त्याची वारंवारता फारच कमी आहे. पहिला मराठी थ्रीडी सिनेमा `आई मला मारू नको’ 2012 मध्ये प्रदर्शित झाला. त्यापाठोपाठ 2013 मध्ये महेश कोठारेंनी `झपाटलेला 2’ची निर्मिती केली तर 2014 मध्ये बनलेला `ध्यास’ हा मराठीतील शेवटचा टूडी ते थ्रीडी स्टिरिओस्कोपिक सिनेमा ठरला. असे मोजकेच थ्रीडी सिनेमे बनले. आता या सिनेमांची वारंवारता निर्माण करण्यासाठी अल्ट्रा मीडिया आणि एण्टरटेन्मेंट प्रा.लि. सज्ज झाली आहे. पूर्वी `अल्ट्रा व्हिडीओ’ आणि `अल्ट्रा डिस्ट्रिब्युटर’ नावाने ओळखली जाणारी ही कंपनी आता भारतात मराठी थ्रीडी सिनेमे प्रमोट करणार आहेत. या कंपनीची एक शाखा असणारी अल्ट्रा स्टुडिओज आणि डिजिटल आपल्या अत्याधुनिक स्टुडिओजच्या माध्यमातून मराठी चित्रपट निर्मात्यांना थ्रीडी सिनेमे बनवण्याचे जागतिक दर्जाचे सर्वसमावेशक तोडगे अनुदानित तत्त्वावर देणार आहे. या शाखेअंतर्गत प्रत्येक थ्रीडी फिल्ममेकरला त्याच्या अभिनव अपेक्षांनुसार खास बनवण्यात आलेले सोल्युशन्स पॅकेज पुरवण्यात येणार आहे. चित्रपट निर्मात्यांना भारतातच जागतिक दर्जाचे हायटेक थ्रीडी कॉण्टेण्ट आऊटपुट उपलब्ध व्हावे, हाच या उपक्रमामागील मूळ उद्देश आहे.

